आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शनिवार दिनांक २६ ऑक्टोबर २०२४

ठळक बातम्या

1. काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उमेदवारांची दुसरी यादी जाहीर; सावनेरमधून अनुजा केदार यांना तर दक्षिण नागपूरमधून गिरिष पांडव यांना उमेदवारी
2. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची दुसरी यादी जाहीर.
3. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवर 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार.
4. अग्निशमन सेवांकडून मिळणाऱ्या प्रतिसादाचा वेळ कमी करणे आवश्यक असल्याचे नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांचं प्रतिपादन.

काँग्रेस-शिवसेना-राष्ट्रवादी यादी

विधानसभा निवडणुकीसाठी आज काँग्रेसनं २३ तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने १५ जणांची आपली दुसरी उमेदवारी यादी जाहीर केली आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटी तर्फे राज्याच्या विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारांची दुसरी यादी आज जारी करण्यात आली आहे. यात अकोला जिल्ह्यातील अकोट मतदार संघातून महेश गांगणे, वर्धा येथून शेखर शेंडे, नागपूर जिल्ह्यातील सावनेर मधून कॉंग्रेसचे नेते आणि माजी मंत्री सुनिल केदार यांच्या पत्नी अनुजा सुनील केदार, नागपूर दक्षिणमधून गिरीश पांडव, कामठी मतदारसंघातून सुरेश भोयर, भंडारा मतदारसंघातून पूजा ठवकर, गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव मधून दिलीप बनसोड, यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव मधून प्रोफेसर वसंत पुरके, यवतमाळ मधून अनिल उर्फ बाळासाहेब मंगरूळकर, आरणी मधून जितेंद्र मोघे, उमरखेड मधून साहेबराव कांबळे, तर गोंदिया जिल्ह्यातील आमगाव मधून राजकुमार पुरम यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातर्फे आज उमेदवारांची दुसरी यादी जरी करण्यात आली असून बुलढाणा मतदारसंघातून कॉंग्रेसच्या माजी नेत्या जयश्री शेळके आणि यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस मधून पवन जैस्वाल यांना उमेदवारी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या २२ उमदेवारांची दुसरी यादी आज प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत जाहीर केली. पहिल्या यादीत यापूर्वी ४५ उमेदवार जाहीर करण्यात आले होते.यावेळी बोलताना जयंत पाटील म्हणाले, आज दुसरी यादी जाहीर करत आहे. तिसरी यादी आज रात्रीपर्यंत जाहीर करण्याचा प्रयत्न आहे. जाहीर करण्यात आलेल्या उमेदवारांमध्ये विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील आर्वी मतदार संघातून मयुरा काळे यांचा समावेश आहे.

अर्ज दाखल

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या कालच्या चौथ्या दिवस अखेर ९९१ उमेदवारांचे बाराशे ९२ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत, अशी माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत; ३० ऑक्टोबरला या अर्जांची छाननी होईल आणि ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येतील. विधानसभा निवडणुकीसाठी मतदान २० नोव्हेंबरला होत असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

आदिवासी समुदायांच्या सक्रीय सहभागातूनच देशाचा पूर्ण विकास साधता येईल, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. छत्तीसगडच्या भिलाई इथं भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या दीक्षांत समारंभात त्या आज बोलत होत्या. आदिवासी समुदायांकडे नैसर्गिक जीवनशैलीतून मिळालेल्या ज्ञानाचं भांडार आहे, त्यांच्या जीवनशैलीतून आपण अनेक गोष्टी शिकू शकतो आणि देशाच्या शाश्वत विकासात योगदान देऊ शकतो, असंही राष्ट्रपतींनी नमूद केलं. या दीक्षांत समारंभादरम्यान राष्ट्रपतींनी ७ स्नातकांना सुवर्णपदकानं सन्मानित केलं. छत्तीसगडचे राज्यपाल रामेन डेका, मुख्यमंत्री विष्णू देव साई आणि इतर यावेळी उपस्थित होते. राष्ट्रपती मुर्मू आज नया रायपूर इथं आरोग्य विज्ञान आणि आयुष विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभालाही उपस्थित राहणार आहेत.

## माध्यम प्रमाणीकरण

विधानसभा निवडणूक प्रचारासाठी राजकीय जाहिरातींचा प्रत्यक्ष वापर किंवा प्रसारण करण्यापूर्वी या जाहिरातींसाठी राज्यस्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समितीची परवानगी घेणं आवश्यक आहे, असं निवडणूक आयोगानं कळवलं आहे. यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समिती नेमण्यात आल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं म्हटलं आहे. मुद्रित माध्यमांमध्ये मतदानाच्या आधीच्या तसंच मतदानाच्या दिवशी प्रकाशित केल्या जाणाऱ्या राजकीय जाहिरातींसाठीही राजकीय पक्ष, उमेदवार, व्यक्ती यांनी पूर्वपरवानगी घेणं आवश्यक आहे.

## बाजारपेठ बंद

कांद्याची सर्वात मोठी बाजारपेठ असलेली लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती दिवाळी निमित्त सोमवार दिनांक 28 ऑक्टोबर ते शनिवारी 2 नोव्हेंबर पर्यंत सलग सहा दिवस बंद राहणार आहे. या सहा दिवसात व्यापारी कांदा खरेदी करणार असल्याने बाजार समिती बंद राहणार असल्याचे बाजार समितीच्या प्रशासनाने कळवलं आहे. दरम्यान काल या बाजार समितीत कांद्याला प्रति क्विंटल 2,202 रुपये सरासरी भाव मिळाला.

## मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरुन मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रम शृंखलेचा हा एकशे पंधरावा भाग असेल. या कार्यक्रमाचं प्रसारण आकाशवाणी तसंच दूरदर्शनवर करण्यात येईल. आकाशवाणीच्या संकेतस्थळावर तसंच न्युज ऑन ए आय आर या ॲपवर देखील हा कार्यक्रम उपलब्ध असेल. पंतप्रधान कार्यालय तसंच सूचना प्रसारण मंत्रालयाच्या यु ट्युब चॅनलवर मन की बात चं थेट प्रसारण केलं जाईल. हिंदी प्रसारणानंतर लगेचच प्रादेशिक भाषांमध्येही याचं प्रसारण केलं जाणार आहे.

## अग्निशमन सेवा

जीवन-मृत्यूसंबंधित घटनांमध्ये अग्निशमन सेवांकडून मिळणा-या प्रतिसादाचा वेळ कमी करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले. राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय (एनएफएससी), राज नगर, नागपूर येथे "शहरीकरण, औद्योगिकीकरण, हवामान बदल," या विषयावरील संवादात्मक सत्रादरम्यान ते अग्निशमन सेवांसमोरील आव्हाने या विषयावर बोलत होते. एनएफएससीचे संचालक नागेश शिंगणे यांची यावेळी उपस्थिती होती. चौधरी यांनी हवामान बदलामुळे तीव्र झालेल्या शहरी पुरासारख्या वारंवार आणि गंभीर नैसर्गिक आपत्तींमुळे

अग्निशमन सेवेवरील वाढलेल्या ताणावर चर्चा केली. यामुळे नागपूर महानगरपालिकेने आपत्कालीन तयारीसाठी संसाधने वाढवली असल्याचे ते म्हणाले. "भविष्यातील आपत्तींचा सामना करण्यासाठी संरचित, सतत प्रशिक्षण आणि नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.प्रतिसादाची वेळ अनुकूल करण्यासाठी मास्टर प्लॅन तयार करण्यात आला असून 22 अग्निशमन केंद्रे तयार करण्यात येत आहेत. त्यापैकी 11 सध्या कार्यरत आहेत आणि 2 चे बांधकाम सुरू आहेत. दुर्घटना स्थळी वाहन तातडीने वाहन पाठवण्यासाठी जीपीएस ट्रॅकिंगचा वापर करून केंद्रीय कमांड आणि कंट्रोल सेंटरची स्थापना करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. नागेश शिंगणे यांनी एनएफएससीची दीर्घकालीन भूमिका, संपूर्ण भारतातील अग्निशमन अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे आणि अग्निशामक अभियांत्रिकीचे प्रगत अभ्यासक्रम सुरू करणे याविषयीची भूमिका मांडली.

लोकबिरादरी

गडचिरोली जिल्ह्यातल्या हेमलकसा इथल्या पद्मश्री डॉक्टर प्रकाश आमटे यांच्या लोकबिरादरी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी नागपूर विभागीय शालेय मल्लखांब आणि रोप मल्लखांब स्पर्धेत विजेतेपद पटकावलं आहे. खो-खो स्पर्धेतही लोकबिरादरीचा चमू विजेता ठरला.१४ वर्षे वयोगटातील मल्लखांब आणि रोप मल्लखांब ही स्पर्धा चंद्रपूर जिल्ह्यात वरोरा इथं घेण्यात आली. या स्पर्धेत लोकबिरादरी आश्रमशाळेच्या १३ खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे. खो-खो ची १७ वर्षे वयोगटातील मुलींची विभागीय स्पर्धा गडचिरोली इथं झाली. या स्पर्धेतही लोकबिरादरीच्या विद्यार्थिनींनी विजेतेपद पटकावल्याने त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे. डॉक्टर प्रकाश आमटे, डॉक्टर मंदाकिनी आमटे, अनिकेत आमटे यांनी विजेत्या खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे.

आढावा विधानसभा मतदारसंघांचा

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज मुंबई शहर या जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

रांगोळी स्पर्धा

आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुक 2024 अंतर्गत येत्या 29 ऑक्टोबर रोजी भंडारा जिल्हा स्तरीय रांगोळी स्पर्धा सकाळी 9 वाजता, जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा येथे आयोजीत केली आहे, तसेच सायंकाळी 5.00 वाजता जिल्हा क्रिडा संकुल इथं SVEEP कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती कार्यक्रम जिल्हाधिकारी संजय कोलते यांच्या उपस्थितीत आयोजित केले आहे. भंडारा जिल्हा SVEEP कार्यक्रमांतर्गत मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता राबविलेल्या विविध उपक्रमाची माहिती देण्यासाठी ELC, VAF, CHUNAV PATHSHALA द्वारे 'कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.

१२ ओळखीचे पुरावे ग्राह्य

मतदानासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार ओळखपत्र (EPIC) व्यतिरिक्त अन्य १२ ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदारांना मतदान करता येईल, अशी माहिती निवडणूक आयोगाच्या वतीने देण्यात आली आहे. मतदार ओळखपत्र नसणाऱ्या मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ पैकी कोणताही

एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. यामध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पारपत्र, निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र असे 12 पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. प्रवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि मतदार ओळखपत्र किंवा वरील 12 पैकी कोणताही एक पुरावा सोबत घेवून जाणे आवश्यक आहे.

कसोटी क्रिकेट

भारत आणि न्युझीलंड संघ दरम्यान खेळल्या गेलेल्या दुसर्या क्रिकेट कसोटी मध्ये न्युझीलंड संघाने भारतीय संघाचा ११३ धावांनी पराजय केला.मिशेल संटनरने दुसऱ्या डावात 29 षटकात सहा विकेट मिळवल्या. आणि पहिल्या डावात 19.3 षटकांच्या अखंड स्पेलसह 7 बाद 53 धावा देऊन न्यूझीलंडला भारतात पहिला मालिका विजय मिळवून दिला. 2012 नंतर भारताचा घरच्या मालिकेत हा पहिला पराभव झाला.

******